शुक्रवार दि.४ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ३१
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६


दैनिक बीड लोकनेता
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# शहांच्या विधानाचा फडशा दसरा मेळाव्यात पाडणार

## उद्धव ठाकरे यांचा भाजपला इशारा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

गेली २ अडीच वर्षे आम्ही न्याय मंदिराची दारं ठोठावत आहोत, हात दुखायला लागले. न्याय देवतेवर विश्वास आहे पण अजूनही न्याय मिळत नाही. मग आम्ही असे ठरवले की जगदंबेला साकडे घालायचे की तू तरी आता दार उघड. गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्यांचा फडशा आपण दसरा मेळाव्याला पाडू असे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान उद्धव ठाकरे म्हणाले की, आम्ही आता जनतेच्या न्यायालयात न्याय मागण्यासाठी जात आहोत, मला विश्वास आहे की ही सगळी तोतयागिरी चालली आहे. घटनाबाह्य सरकारचे घोटाळे, महिलांवर अत्याचार सुरू आहेत. आई जगदंबेला मनापासून हाक मारली की ती भक्ताच्या रक्षणासाठी धावून येते हे इतिहासात दिसले आहे, आणि पुढेही दिसेल.

असुरांचा संहार कराया मशाल हाती दे.. सतवरी भूवरी ये ग अंबे.. सतवरी भूवरी ये.., असे या गीताचे बोल आहेत.'विधानसभा निवडणुकीसाठी ठाकरे गटाने उद्धव ठाकरे यांच्या हस्ते हे मशाल गीत लाँच केले आहे. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, जे जे बोलायचे आहे ते बोलून घ्या, सौ सोनार की एक लोहार की, असे म्हणत शेवटी त्यांनी शिंदे गटाला टोला लगावला.माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, आपल्या परंपरेप्रमाणे दसरा मेळाव्याला शिवाजी पार्कवर आपण भेटणार आहोतच. पण आज नवरात्री सुरू होत आहे, हा आपल्या जगदंबेचा उत्सव आहे. जे आसूर माजले होते त्यांचा वध करणाऱ्या आपल्या जगदंबेचा उत्सव सुरू होत आहे. आजची पत्रकार परिषद ही राजकीय नाही. राज्यात ती अराजकता माजली आहे, तिचा नायनाट करण्यासाठी एक अराजकीय गाणे आपण जगदंबेसाठी तयार केले आहे. एकूणच राज्यामध्ये जी काही तोतया गिरी चाललली आहे. संत एकनाथ यांनी आरोळी मारली होती बाई दार उघड पण आज त्यांच्या नावाने तोतयागिरी करणारे खूप झाले तिचा नायनाट करण्यासाठी हे गाणे जगदंबे चरणी सादर करत आहोत.

## चोरीचा गुन्हा दाखल असलेला आरोपी पौलीसांचा हातावर तुरी देऊन पसार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले

श्रीगोंदा पोलीस स्टेशनला चोरीचा गुन्हा दाखल असलेला आरोपी समाधान हरिभाऊ मगर रा अंभोरा ता. मंठा जि. जालना वय ३४ हा आरोपी संध्याकाळी रुग्णालयात उपचारासाठी नेत असताना सोबतच्या पोलिसांचा हात हिसकावून बेडी सह पळून गेला.याबाबत माहिती मिळताच पोलिस निरीक्षक किरण शिंदे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपीला पकडण्यासाठी तीन पथके संबंधित आरोपीच्या तपासासाठी रवाना केले आहेत.

श्रीगोंदा शहरातील तुळसाई कृषी केंद्रात कामाला असताना ज्या दुकानात कामाला होता त्याच दुकानात चोरी करून फरार झालेला आरोपी समाधान मगर याला पोलिसांनी गुन्हा दाखल झाला नंतर २९ तारखेला अटक केली होती.

पोलीस कोठडीत असतांना संबंधित आरोपीला आज सायंकाळी वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात



नेल असताना समाधान मगर याने सोबत असलेला पोलीस कर्मचारी सचिन म्हस्के यांच्या हाताला झटका देऊन आणि त्याच्यावर हल्ला करून हातात असलेल्या बेडीसह पळून गेला.सदर संशयित गुन्हेगार पळून गेल्यामुळे पोलिस प्रशासन खडबडून जागे झाले व त्याच्या मागावर तीन पोलीस पथके रवाना केले आहेत.याबाबत माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे साहेब यांनी श्रीगोंदा पोलिस स्टेशन येथे भेट दिली आहे.

## उमरखेड पोदारच्या नैतिक टवानीची राज्यस्तरावर निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड | सय्यद रहीम राजा

क्रीडा व युवक संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ अंतर्गत गुरूवार दि.२६ सप्टेंबर रोजी ऑफीसर क्लब, अमरावती येथे झालेल्या विभागीय लॉन टेनिस स्पर्धेत संस्कार पोदार लर्न स्कूल, उमरखेड चे विद्यार्थी नैतीक टवानी व आदित्य सोनोने यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत नैतिक टवानी याने प्रथम क्रमांक प्राप्त करून सुवर्ण पदाचा मान मिळवला व राज्यस्तरीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी त्याची निवड झाली.

त्यापूर्वी जिल्हास्तरीय स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत दिग्रस च्या मोहम्मदला ४ - ० ने तर उपांत्य फेरीत पोद्दार उमरखेड च्या आदित्य सोनवणे ला ४ - ० ने आणि जिल्हास्तरीय अंतिम सामन्यात उमरखेड च्या पार्थ टवानीला ५ - २ ने हरवून जिल्हास्तरीय सामन्यात प्रथम येण्याचा मान



मिळवला विभागीय सामन्यात प्रथम सामन्यात वाशिम च्या आशुतोष बदारकर ला ३ - ० ने उपांत्यपूर्व सामन्यात अकोल्याच्या विहान मेहताला ३ - ० ने उपांत्य सामन्यात अमरावतीच्या मीत झंवर ला ५ - ३ ने तर विभागीय अतिशय चुरशीच्या अंतिम सामन्यात अमरावतीच्या हितेश लाहेला ५ - ४ ने हरवून विभागीय सामन्यात प्रथम आला. उमरखेड सारख्या लहानश्या गावातून थेट पहिल्याच वर्षी लॉन टेनिस जिल्हास्तरीय आणि विभागीय सामन्यात प्रथम येऊन राज्यस्तरीय स्पर्धे साठी पात्र ठरणे उमरखेड तालुका साठी गौरवास्पद असून सर्वत्र नैतिकचे कौतुक होत आहे. या करिता पोदार उमरखेड तर्फे नैतिक टवाणी, आदित्य सोनवणे आणि कुस्तीपटू श्रीतेज जाधव यांच्या सपरिवार सत्कार करण्यात आला.

टेनिस क्लब उमरखेड द्वारा आयोजित शिबिरात टेनिस कोच विकास शर्मा, टेनिसपटू वडील पवन टवाणी, काका सचिन टवाणी यांच्या मार्गदर्शनाखाली नैतिक ने आपल्या टेनिस प्रवासाची सुरवात केली आणि १४ वर्षा खलील स्पर्धे मध्ये नेत्रदीपक यश मिळविले, क्रीडाशिक्षक भावेश पटेल, राहुल राठोड, सचिन शिंदे यांचे सहकार्य मिळाले. संस्थेचे संचालक राजेश देशमुख, अजय क्षीरसागर, निशांत बयास, धिरज बागडे, शाळेचे प्राचार्य डॉ. भैरोबा मुंजाळ, प्रशासकीय अधिकारी अतिश दिघेवार, क्रीडा आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## संगणक हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य घटक असल्याने संगणक साक्षर होणे ही काळाची गरज-गटशिक्षणाधिकारी यादव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी | अण्णासाहेब साबळे

संगणक हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य घटक असून संगणक साक्षर होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आष्टी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांनी आष्टी येथील मदरसा इस्लामिया दारुल उलूम,जामा मस्जिद,मोगलपुरा च्या संगणक कक्षाच्या उद्घाटनाप्रसंगी केले.

आष्टी येथील जामा मजीद येथील परिसरात सुरू असलेल्या या दारुल-उलूम येथे विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्यासाठी सामाज बांधवांच्या सहभागातून सुसज्ज असलेल्या संगणकाच्या उद्घाटन गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांच्या हस्ते झाले यावेळी या कार्यक्रमास आष्टी नगरपंचायत चे नगराध्यक्ष मिर्झा झिया बेग,माजी शिक्षण सभापती नियामत बेग,गुलाम हाफिज, मौलाना उमर यांच्यासह सर्व स्तरातील



मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना सुधाकर यादव म्हणाले की १९८५ साली नव्यानेच आलेल्या संगणकाचा आकार मोठा होता त्याला फार मोठी जागा लागत होती मात्र आज २०२४ मध्ये टेबलावरचा संगणक हातात च्या स्मार्ट वॉच मध्ये परिवर्तित झाला असून ही संगणकाच्या युगात झालेली मोठी क्रांती आहे.काळा बरोबर विद्यार्थ्यांनी संगणक साक्षर होऊन स्वत:सोबत समाजाचा आणि देशाचा विकासामध्ये हातभार लावण्यासाठी प्रयत्न करावा व संगणक साक्षर व्हावे असे त्यांनी यावेळी सांगितले.सध्याच्या काळात संगणक हा आपल्या दैनंदिन जीवनाचा एक आवश्यक घटक आहे.याचा अर्थ असा की संगणक व्यावहारिकपणे प्रत्येक उद्योगात वापरला जातो, जो आपल्या दैनंदिन कार्यांना सुलभ करतो आणि वेगवान करतो. आज,आपली घरे,बँका, दुकाने,शाळा,रुग्णालये आणि रेल्वे यासह विविध ठिकाणी संगणक वापरले जातात यामुळे संगणक साक्षर होणे काळाची गरज आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी गट शिक्षण कार्यालयाचे शालेय पोषण आहाराचे प्रमुख शिवाजी आव्हाड ,शेख जुनेद, मनोज यादव यांच्यासह संजय भोकरे,पोले सर,बनकर सर,शिंदे सर,आजबे सर,विश्वकर्मा सर,शेख मुजाहिद इंजिनियर यांच्यासह समाजातील सर्व मान्यवरांची उपस्थिती होती यावेळी संगणक कक्षाचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उद्घाटन करून पाहणी करण्यात आली विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या या उपक्रमाचे गटशिक्षणाधिकारी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.यावेळी मोठी संख्येने विद्यार्थ्यांसह पालक यांची उपस्थिती होती.




झाडे लावा झाडे जगवा

### चारोळी

इर्षा तुलना कशास करावी?
स्वत:च्या प्रगतीची आस धरावी
बदलाच्या चक्राची पाती फिरावी
नविन्याच्या शोधात झोळी भरावी

रंजना सानप
मायणी (सातारा)

## शारदीय नवरात्रोत्सवाला जल्लोषात सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

आजपासून देशभरात शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ होत आहे. घटस्थापनेपासून नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवाचा देशभरात जल्लोष अन् उत्साह पाहायला मिळत आहे.महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिरात आज पासून शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होत आहे.पहाटेच नऊ दिवसांची मंचकी निद्रा संपून देवी सिंहासनावर विराजमान झाली आहे.भाविकांची गैरसोय होऊ नये याकरिता तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून देखील जयत तयारी करण्यात आली आहे. नवरात्र उत्सवामुळे तुळजापूर नगरी भाविकांनी फुलून गेल्याचे चित्र आहे. राज्यासह देशभरातील लाखो भाविक तुळजापुरात दाखल होत आहेत .महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिरात आज पासून शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात होत आहे. देवीच्या गाभाऱ्यात दुपारी बारा वाजता तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांच्या हस्ते सपत्नीक विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात येणार आहे.




# अंदमान च्या बेटा वरून

लेखक ❋ धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर



**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येत आहे. आजच्या अंकात सोबत असलेल्या प्रवाशांच्या प्रतिक्रिया प्रसिध्द करण्यात येणार आहेत.तसेच उद्याच्या शेवटच्या भागात वाचकांच्या प्रतिक्रिया प्रसिध्द करण्यात येणार असल्यामुळे वाचकांना ही लेख माला कशी वाटली याबद्दल मोजक्या शब्दात प्रतिक्रिया ९४२१८ ३९३३३ या व्हाट्सअप क्रमांक वर पाठवाव्या ही विनंती. – संपादक**

**(भाग ८)**

लोकनेता न्यूज नेटवर्क

प्रा. डॉ. लक्ष्मी पुरणशेट्टीवार माय हॉलिडेज आणि भाऊ ट्रॅव्हल्स नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंदमान टूर द्वारे ज्येष्ठ नागरिकांच्या मनातील अंदमान प्रत्यक्षात उतरविण्याचा स्तुत्य उपक्रम आयोजकांनी केला. २५ सप्टेंबर ते एक ऑक्टोबर दरम्यान अंदमान टूर मधून एकूण ६० प्रवासी अंदमान बेटाचा मनसोक्त आनंद लुटले. या प्रवासाचे खरे आकर्षण समुद्र, निसर्ग ,जंगल, बोटीचा प्रवास त्याच सोबत मोठे जहाज म्हणजेच क्रूज मधून अविस्मरणीय असा प्रवास झाला. यामुळेच आनंद आणि समाधान लाभले व तणावमुक्ती झाली. स्वातंत्र्यवीर सावरकर व अनेक राष्ट्रभक्त हुतात्म्यांच्या स्वातंत्र्यासाठी दिलेला बलिदान व शहिदांचे स्मरण सेल्युलर जेलमधून प्रत्यक्षात दिसून आले. सेल्युलर जेल मधील लेझर शो अस्मरणीय ठरला. याशिवाय मनसोक्त निसर्ग सौंदर्य डोळ्यात, मनात टिपता आले. ज्येष्ठ प्रवाशांच्या आरोग्याचा विचार करत वेळेवर रुचकर नाश्ता, जेवण, चहा, पाणी, झोप याची काळजी घेण्यात आली. संपूर्ण प्रवास आनंददायी व खेळीमेळीचा होता. खासकर अनुभव संपन्न ड.दिलीप ठाकूर सोबत असल्यामुळे सहलीचा आनंद द्विगणित झाला.

अशा अनेक धार्मिक, अध्यात्मिक, ऐतिहासिक सहलींचा अनुभव असल्यामुळे त्यांनी व्यवस्थितरित्या, नियोजनबद्ध अंदमान टूर घडवून आणला. त्यांच्यातील सातत्यपूर्ण प्रयत्न, संपर्क आणि संवाद व संदीप मैद सरांच्या टीमचे व्यवस्थापन यामुळेच ही अंदमान यात्रा सुखकारक ठरली. शेवटी पोर्ट ब्लेअर येथील विमानतळावर सामूहिक रित्या सादर केलेले जयस्तुते हे गीत पुन्हा एकदा विमानात सादर करण्याची दिलीपभाऊंची कल्पना अफलातून त्यांनी मला लीड करण्याची संधी दिली.यातून देशभक्ती, राष्ट्रभक्ती याचे अतुलनीय दर्शन घडले. अंदमानच्या बेटावरून ही लेखमाला दररोज आठ ते दहा वृत्तपत्रातून छापून यायची यातून दिलीपभाऊंची लेखन शैली उत्तम असल्याची प्रचिती झाली.अंदमान टूरचा पुन्हा पुन्हा आनंद घेता यावा यासाठी त्यांचे सर्व लेख मी मोबाईल मध्ये जपून ठेवले आहे. त्यांचे लेख वाचून अनेकांनी मला आम्हालाही अंदमानला दिलीप भाऊंच्या टीम सोबत जायचे असे आवर्जून सांगितलेले आहे. यामुळे संपूर्ण टीमचे अभिनंदन व त्यांच्या पुढील अंदमान टूर ला शुभेच्छा.

**योगगुरू रमेश केंद्रे**

मनातील अंदमान टूर्स प्रत्यक्ष उतरवण्यासाठी प्रयत्न करणारी माय हालीडेज ,भाऊ ट्रॅव्हल्स चे दिलीपभाऊ ठाकूर, संदीपजी, विशाल मुळे,किरण मोरे, जयंतजी व सर्व कार्यालयीन कर्मचारी यांचे प्रथम अभिनंदन.

स्वातंत्र्यवीर सावरकर व अनेक राष्ट्रभक्त हुतात्म्यांच्या स्वातंत्र्य मिळवण्यासाठी केलेली सर्वोच्च बलिदानाचा लेजर शो पाहिल्यावर मन सुन्न झालं.निसर्ग, समुद्र किनारे, जंगल, जहाज, विमान प्रवास तसेच निवास भोजन व्यवस्था व्यवस्थापन वाखाणण्याजोगे होते.सातत्य, संपर्क,व संवाद या तिन सुत्रा नुसार ही टिम कार्यरत आहे.नांदेड वासियांनी माय हालिडेज,भाऊ ट्रॅव्हल्सचा अधिक अधिक फायदा घेऊन पर्यटनातून तणाव मुक्ती, व्यक्तीमत्व विकास, सामाजिकदृष्ट्या व आध्यात्मिक विकास करून घ्यावा.पुनश्च टिम चे अभिनंदन.

तुकाराम इंद्राळे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता

श्री दिलीपभाऊ, संदिपजी आणि जयंत यांच्या संयुक्त सुक्ष्म व दूरदृष्टी नियोजनामुळे आंदमान ट्रीप सुंदर सोईस्कर व अफलातून पार पडली. या ट्रीप मध्ये खूप काही नवीन अनुभव व अनोखे निसर्ग सौंदर्य पाहावयास मिळाले. या टूर बद्दल मी लिहिलेल्या काव्यपंक्ती.

संदीप आणि दिलीप भाऊ माय हॉलीडेजची शान
त्यांनी काढला टुर त्यांचं नाव आंदमान
हौशी गौशी आणि म्हातारांचा उत्साह भारी
एक एक मोजता मोजता भरले ५०च्या वरी
माय हॉलीडेजची टीम आंदमानला पोहोचली
काळ्यापाण्याची सजा काय असते येथे ऊमजली

**क्रुर कर्मट इंग्रज ते हैवान**

स्वतंत्र्यासाठी सावरकरासह अनेक विरानी लढले बेभान
रॉस आणि नॉर्थ बे आयलंडची छबी न्यारी
रीफ कोरलचा आनंद सर्वांनी लुटला भारी
येथे एका पेक्षा एक तरा जनू ड्रेसिंग चा मेला
नवरोबा मात्र ओझे वाहून वाहून थंड झाला
सर्वात सुंदर,बीच राधानगर, हे भारताचे अभिमान
काही पोहले बीचवर खेळले काही बाकड्यावर लोळले

**सर्वझाले मस्तीवान**

आंदमान सागरी, क्रूझची सफारी,ऊत्साह ओसंडून वाही
डॉल्फिनची मस्ती व सागर लहरी सोबतीला ठाई ठाई
वेडी वाकडी वळणे, हिरवीगर्द झाडी, आलो सुंदर वनात
हे तर आंदमानचे दाट जंगल येथे राहतात जारवा जमात
बाराटांगच्या खाडीत,मॅंग्रोव्हच्या बनात, बोट करते थरार
चुनखडीची लेणी किती अजब हा तर निसर्गाचा चमत्कार
आमची ट्रीप मस्त आणि झकास झाली निर्विवाद
माय हॉलीडे व भाऊ ट्रॅव्हल्सच्या टीमला आम्ही देतो धन्यवाद

**आम्ही देतो धन्यवाद**

प्राचार्य डॉ राम जाधव,प्रा.डॉ.सौ.कल्पना जाधव नांदेड. माय हालिडे आणि भाऊ ट्रेव्हल्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या अंदमान ट्रीपचा प्रवास एक सुखद अनुभव देणारा ठरला.दिलीप ठाकूर भाऊ, संदिप मेड सर, विशाल मुळे सर, जयंत सर, आणि किरण सर या सगळ्यांचे उत्तम सहकार्य लाभले.नाश्ता, जेवण, निवासाची व्यवस्था वाखाणण्याजोगी होती.एकमेकांचे को- आर्डिनेशन मस्त होते.नेतृत्वगुण व हजरजबाबीपणा यामुळे ही ट्रीप मस्त झाली.सगळ्यांचे मनापासून आभार आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा!

उषा गैनवाड, मराठीच्या शिक्षिका

पहिली माझी ओवी ग
दिलीपभाउंना
सहल नेली अंदमानला गोविंदा, गोविंदा
दुसरी माझी.
संदीपजी भाउंना
आओ,आओ सगळे म्हणा गोविंदा .
तिसरी माझी..
जयंत वाणीला
१०-१० चा ग्रृप करा
गोविंदा .
चौथी माझी..
सहलीच्या मैत्रीनींना
मनसोक्त आनंद लुटला
गोविंदा.
पाचवी माझी..
ओझे घेणार्या भावांना
ओझे पाहून कुली पळाले
गोविंदा.
सहावी माझी..
जमलेल्या सर्वांना
परत आपण भेटु या
गोविंदा.
सातवी माझी..
विनंती करते सर्वांना
प्रचार, करू या माय हॉलीडे व भाऊ ट्रॅव्हलस चा
गोविंदा,गोविंदा.

आशा चेके

ट्रिप खूप खूप छान झाली. अन्नदान, नेत्रदान,रक्तदान करता करता दिलीपभाऊ आपण आनंदाचे दान करत आहात.पैसे असूनही फिरायला जाण्यासाठी योग्य कंपनी मिळत नाही ते काम करण्याचा विडा आपण उचलून नांदेडकरांना आनंद देता आहात. त्याबद्दल भाऊ आपले व माय हॉलिडे टीमचे खूप खूप धन्यवाद.

**सौ.सुरेखा व सुभाष भिसे.**

अंदमान टूर मध्ये जंगलाची सफर, समुद्राची सफर व विमानाने हवेतून सफर अशा वेगवेगळ्या सफरीचा अद्भूत असा अनुभव आला.ह्या बेटाला निसर्गाच खूप मोठ वरदान आहे.ईथे असलेली कमालीची स्वच्छता सुद्धा मनाला भावनारी आहे.विमानातून जात असताना बाजुला बिहारचा एक प्रवासी बसला होता.तो अंदमानच्या लोकांविषयी सांगत होता,इथले लोक प्रामाणीक, नियम पाळनारे व खूप समाधानी आहेत.टूर खूप छान झाला, नियोजन उत्तम होते.दिलीपभाउ ठाकूर, संदीप सर, विशाल मुळे , किरण मोरे व जयंत वानी सर्वांचे उत्तम सहकार्य लाभले.

**प्रा.बालाजी कोटलवार**

श्री दिलीपभाऊ,संदीप मेड आणि जयंत वाणी यांच्या टीम ने आम्हा सेवानिवृत्त्यांची अंदमान सहल छान व सुखरूप पुर्ण केली.राहण्याची सोय व रोजच्या नाष्टा व जेवण ही उत्तम होती. असेच सहल नियोजन भविष्यात करावे. अनोख्या प्रकारचा हा आनंद ज्येष्ठ नागरिकांना आपणाकडून मिळत राहील अशी अपेक्षा करतो.

**ऊद्धव चौधरी,सेवानिवृत गट निदेशक ,आयटीआय,वैष्णवी नगर नांदेड**

माय हॉलीडे व भाऊ ट्रॅव्हल्सची अंदमान सहल यशस्वी व निर्विघ्न पार पडली. हे सर्व दिलीपभाऊ ठाकुर , संदिप मैंद , जयंत वाणी माय हॉलीडे ची टीम यांच्या सामुहीक प्रयत्नामुळे शक्य झाले.या टूर मध्ये जास्तीत जास्त सिनिअर सिटीजन मंडळी सहभागी होती.या सर्व मंडळीचा विचार करूनच कोणताही त्रास होणार नाही या कडे बारकाईने लक्ष दिल्या गेले.विशेषत:वेळेवर रूचकर नास्ता ,जेवण ,चहा व पाणी याची उत्तम व्यवस्था करण्यात आली.त्यामुळे कोणालाही कसलाही त्रास झाला नाही.या मुळेच आपल्या सोबत पुन्हा पुन्हा यावे वाटते.

आपणास एक विनंती आहे,महिला स्पेशल गोवा टूर प्रोग्रॅम तयार करावे या सहलीस पण आपणास चांगला प्रतिसाद मिळेल.माय हॉलीडे टीम व भाऊस धन्यवाद.

**सुधीर गोविंदराव देशपांडे, महावीर नगर हिंगोली**

माय हॉलीडेज व भाऊ ट्रॅव्हल्स ने आयोजीत केलेली अंदमान टुर ही आमची त्यांच्या सोबतची दुसरी टुर. यापूर्वी आम्ही मागील वर्षी त्यांच्या सोबत केरळ टुरला गेलो होतो त्यासारखाच अनुभव याही टुरला आला.अप्रतिम सुंदर नियोजन.स्वतः दिलीपजी ठाकुर हे संदीप मैंद आणि जयंत वाणी यांचे सोबत या टुरमधे सहभागी झाल्यामुळे कुठेही कमतरता पडली नाही.आयोजन खुपच निटनेटके,जेवणाची व्यवस्था उत्कृष्ट या सर्व बाबींमुळे आमची अंदमान टुर संस्मरणीय झाली धन्यवाद

**सौ मैथिली व मुकुंद पांडे**

माय हॉलीडे कडून आयोजित करण्यात आलेली अंदमान ट्रिप खुप छान झाली.मला अंदमान ला जाण्याची खुप ईच्छा होती .ती माय हॉलीडे मुळे पुर्ण झाली. दिलीप भाऊ,संदीप सर, जयंत सर ,कीरणसर यांनी ट्रीप मध्ये आमची खुप काळजी घेतली. त्यामुळेच आम्ही अंदमान येथे जाऊन स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करु शकलो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे विमानतळावर स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जयोस्तुते हे गाणे सर्वांनी एक सुरात सादर केले. तिथे असलेले ईतर प्रवासी सुध्दा आमच्यात सामील झाले ही दिलीप भाऊ ची कल्पना खूपच आवडली.सहल खूप छान झाली. दिलीपभाऊ ठाकूर सोबत असल्यामुळे अजून चांगली झाली. टीम मधील सर्वांचे मनापासून आभार

**उज्वला केंद्रे**

खुप दिवसांपासुन अंदमानला जाण्याची इच्छा होती, ती पूर्ण झाली, सर्व व्यवस्था एकदम उत्तम होती, आम्हाला कुठलाही त्रास झाला नाही.सहली मधील सगळे सोबती छान मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यामुळे टुर अतिशय छान झाला. ट्रीप प्रमुख श्रीयुत दिलीप ठाकुरभाऊ, संदीप सर, जयंत सर यांनी सर्व व्यवस्था उत्तम छान केली, खुप खुप धन्यवाद

**विजया इंद्राळे**

अंदमानचा टूर नेहमीप्रमाणे एकदम छान झाला.जेवण, हॉटेल एकदम उत्तम. थँक्स दिलीप भाऊ, संदीपजी व जयंत

**डॉ . प्रकाश लालपोतू वसमत नगर.**

माय हॉलिडे आयोजित अंदमान टूर मध्ये सौ सह सहभागी झालो होतो. त्यांच्या सोबत ची ही पहिलीच टूर. सुरवातीला दोन दिवस व्यवस्थापन नियोजन शून्य होते .समन्वयाचा अभाव होता.त्या मुळे नाराज झालो. तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आणि सुधारणा झाली .बाकी निवास व्यवस्था. नाश्ता जेवण अतिशय उत्कृष्ट होतेीह हरीं श रिळव षी. नमूद केलेली सर्व पर्यटन स्थळ दाखविली गेली. अंदमान ट्रीप चे राहिलेले स्वप्न पूर्ण झाले. ग्रुप मधील सर्व सहभागी सदस्य एक मेकांशी खेळी मेळीत राहिले. एकंदरीत ट्रीप आनंददायी झाली. माय हॉलिडे टीम ला धन्यवाद.

**वसुंधरा प्रकाश लालपोतू, वसमत**

अंदमान टूर एकदम छान झाली. जेवणाची राहण्याची उत्तम सोय होती. आम्हाला काहीही त्रास झाला नाही. ठाकूरसर संदीपसर ,जयंतचे आभार.

**रमेश जयकर, सेवानिवृत्त बँक मॅनेजर**

अंदमान ट्रीप.एक अतिशय सुंदर अनुभव जो आम्हाला my Holidays tours यांच्या कडून अनुभवता आला.आमच्या सहली मधील सगळे सोबती खूप मनमिळाऊ होते...विशेष म्हणजे जास्त लोक जेष्ठ नागरिक होते .ट्रीप मॅनेजर श्रीयुत दिलीपजी ठाकूर, संदीपसर, व जयंत यांच्या अतिशय चोख व्यवस्थापन या मुळे ट्रीप मध्ये कुठेही अडचण आली नाही.तसेच प्रत्येक हॉटेल खूप आरामदायी होते.रोजच्या नाश्ता,जेवणाची लज्जत तर खूपच भारी.या ट्रीप मुळे रेल्वे, विमान,जहाज, पाताळ या चारही मधून सफर करायला मिळाला .

**सौ.विजया व माजी न्यायाधीश विजय कुलकर्णी**

Dilip Bhau. Trip organised by you very nicely. We are very happy. Thanks.

**सुधीर देशपांडे**

Special Thanks to tour arranger My Holidays and Bhau travels.Tour is very memeobil and very inspirabl.

**विशेष आग्रहाची विनंती**

उद्याच्या शेवटच्या भागात वाचकांच्या प्रतिक्रिया प्रसिध्द करण्यात येणार असल्यामुळे वाचकांना ही लेख माला कशी वाटली याबद्दल मोजक्या शब्दात प्रतिक्रिया आज सायंकाळपर्यंत ९४२१८ ३९३३३ या व्हाट्सअप क्रमांक वर पाठवाव्या ही विनंती.

(क्रमशः)

# नोंदणीकृत गोशाळेबरोबरच देशी गाईचे संगोपन व संरक्षण करणाऱ्या बळीराजाला प्रतिदिन प्रति गाय पन्नास रुपये अनुदान द्या–शिवभुषण जाधव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

नोंदणीकृत गोशाळेबरोबरच देशी गाईचे संगोपन व संरक्षण करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिदिन प्रति गाय ५०/- रुपये अनुदान देण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्रजी पवार) पाटोदा तालुकाध्यक्ष श्री.शिवभुषण जाधव यांनी मा.ना. एकनाथजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा.ना.देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री,मा.ना.अजित दादा पवार उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना तहसीलदार, तहसिल कार्यालय पाटोदा मार्फत दिले आहे. शिवभुषण जाधव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की काल परवाच आपण म्हणजेच महाराष्ट्र सरकारने, महाराष्ट्रातील देशी वंशाच्या गाईंना राज्य मातेचा दर्जा देऊन गौरविले आहे व देशी गाईंना सांभाळणाऱ्या व संरक्षण देणाऱ्या रजिस्टर गोशाळेंना प्रति दिन प्रति गाय ५०/- रुपये अनुदान घोषित केले आहे. त्या बद्दल आपले व आपल्या सरकारचे अभिनंदन..! खरं पाहिलं तर गाय हा अनादी काळापासून शेतकऱ्यांचा तसेच महाराष्ट्रीयन व एकूणच भारतीय लोकांचा तिच्या उपयुक्त ते पेक्षा धर्माचा, श्रद्धेचा, म्हणूनच भावनेचा विषय होता आणि आहे. मनुष्य म्हणूनच आम्हा भारतीयांना, संस्कृती रक्षकांना, माणसात देव न शोधता, पशुमध्ये देव दाखविणाऱ्या धर्मांच्या ठेकेदारांना, माणसाच्या स्पर्शाचा विटाळ होतो आणि गाईला शिवले की सर्व विटाळ निघून जातो, सर्व पापे देखील धुवून जातात, नष्ट होतात, गाईवर सामान्य जणांची एवढी श्रद्धा कि गाईच्या शेपटाला हात लावून बोलणे म्हणजे शंकर शंभर टक्के खरे बोलला असे मानले जाते, कदाचित खरं खोटं करण्यासाठी गाईचे शेपूट ओढ किंवा त्याला हात लाव ही म्हण या मुळेच प्रसिद्ध झाली असेल. गाईवर सामान्य जणांची अपार श्रद्धा आणि व्यवहारिक दृष्ट्या गाय ही शेतकऱ्यांसाठी सर्वसामान्यांसाठी गोरगरिबांसाठी कामधेनुच, कारण काय ती शेतकऱ्यांच्या जीवनात गोकुळ निर्माण करत होती, समृद्धी आणत होती, कुटुंबाची उपजीविका भागवत होती, म्हणून गाय म्हणजे मायच होती. शेतकऱ्यांना गाय, दूध, दही, लोणी, तूप तसेच शेतीच्या कामाकरिता बैल मिळवण्यासाठी तिच्या मलमूत्राचा शेतीच्या सुपीकथेसाठी, श्रद्धा म्हणून, दूध, देवाच्या अभिषेकासाठी, मलमूत्राचा गोमूत्र म्हणून बाटलेल्या माणसाला शुद्ध करण्यासाठी, नव्हे देवालाही शुद्ध करण्यासाठी, जे काही अपवित्र आहे ते पवित्र करण्यासाठी, गोमूत्र प्राशन करण्यासाठी उपयोग होत होता आणि आज देखील विज्ञान युग तंत्रज्ञानाचे युग आहे असे जरी म्हटलं तरी गाईपेक्षा गोमूत्राचे महत्त्व



पटवून देणाऱ्याला आणि समाजाला वाटण साहजिकच आहे. कारण येथे भारतात चंद्रयान पाठविण्याआधी, खुद्द शास्त्रज्ञांना देखील चंद्र यानाची प्रतिकृती बालाजीला अर्पण करावी वाटते. नव्हे अर्पण केली जाते म्हणूनच गर्वाने खरोखरच भारत विश्व गुरु झाला आहे असे वाटते ! खरं पाहिलं तर आम्ही शेतकरी गायी कडे व्यवहारिकतेने उपयुक्त पशु म्हणून जरी वि.दा सावरकरांनी सांगितले आहे तरी पाहत नाही. तो आमचा श्रद्धेचाविषय बनतो किंवा बनवला गेला असेल, म्हणूनच आम्ही शेतकरी गाईच नाही तर गोवंश बैल याचा सुद्धा सांभाळ करत आहोत, धर्माचे ठेकेदार स्वतःच्या आई- वडिलांना वृद्धाश्रमाचे दार दाखवतात परंतु आम्ही शेतकरी आयुष्यभर कष्ट केलेला बैलाला, शेतकऱ्यांच्या जीवनाचे गोकुळ करणाऱ्या गाईला, दावणीलाच मरू देतात व मेल्यावर त्यांना मिठात पुरतात हीच आमची शेतकरी संस्कृती आमचा धर्म आणि हाच खरा हिंदू धर्म, परंतु वाढती लोकसंख्या, वाढता दुष्काळ, वाढते शेतीवरील अवलंबित, व कमी झालेले चराऊ शेतकुरणे, देशी गोवंशापासून मिळणारे कमी दूध, दुधाला न मिळणारा योग्य भाव, वाढलेले पशुखाद्याचे भाव, दूध भेसळ, आतभट्ट्यात आलेली शेती, यांत्रिकीकरण, शासनकर्त्यांचे शेतीबद्दलचे उदासीन धोरण, यातून शेतकऱ्यांचे आर्थिक धोरणच नाही तर शेतकरी वर्ग कोलमडून गेला. गोवंश सांभाळणे आर्थिकदृष्ट्या न परवडणारे झाले. भावनिक दृष्ट्या नाईलाजाने दावणीला चाऱ्याअभावी पाण्याअभावी दावणीला तरफडून मारण्यापेक्षा जनावराला बाजार दाखवावा लागला कसायाच्या हातात आपल्या गाईचा दोर देताना त्याचा हात थरथरत होता, कमी किमतीत एखादा शेतकरी जर घेईल तर तो त्याला देखील तो द्यावयास तयार होता परंतु सर्व शेतकऱ्यांची तीच व्यथा होती, शेवटी गाय कसायाकडे जात होती, त्या मागचं कारण धोरणकर्ते म्हणवणारे समजून घेत नव्हते व यातूनच ज्याचे कधीच शेणामुतात हात गेले नाहीत, त्यांच्या गोवंशाचा संबंध फक्त गोमूत्रपुरता असणारे गोवंश रक्षक, धर्माचे ठेकेदार, हे कसायाचे कसाई झाले ! वास्तविक पाहता गोवंश हत्याबंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. भाकड जनावरे, आजारी, म्हातारी, अपघात झालेले जनावरे, सांभाळणे शेतकऱ्यांना परवडत नाही. गोवंशहत्या बंदी कायद्यामुळे कसाई देखील जनावरे देखील खरेदी करत नाहीत किंवा खटकाने खरेदी केलेल्या जनावरे पकडली जातात. त्यांच्याकडून हप्ते वसुली देखील चालू आहे. पकडलेली जनावरे गोशाळेकडे पाठवली जातात, पाठवलेल्या जनावरांची कुठे नोंद ना फिर्याद, पुढे त्या जनावरांचे काय होते, काही दिवसांनी ते दिसत देखील नाहीत, त्याचा देखील भावनेच्या खाली राजरोस धंदा होतो कि अशी शंका निर्माण होते ? आणि जेव्हा गाईचे संरक्षण करा म्हणणारे, गोवंशहत्या बंदीचे समर्थन करणारे, व धोरण कर्त्यांचे मुले जेव्हा हॉटेलमध्ये बीफ वर ताव मारण्याच्या बातम्या जेव्हा पेपर मध्ये वाचतो, किंवा बीप व्यापाराच्या संबंधितांनी जेव्हा बातम्या वाचतो, तेव्हा आम्हाला हे सर्व काही मुह मे राम बगल मे छुरी आहे असे वाटते. म्हणून खरंच आपल्या महाराष्ट्रात सरकारला गोमातेचा, राज्य मातेचे, संरक्षण व संवर्धन करायचे असेल तर रजिस्टर गोशाळेबरोबरच देशी गायीचे संवर्धन संरक्षण, सांभाळ करणाऱ्या शेतकऱ्यांना ज्यांच्या गाईच्या नोंदी संबंधित ग्राम पंचायत, पशुवैद्यकीय अधिकारी दवाखाना, यांच्या कडे आहेत, पुरेपूर खात्री करून फोटो, टॅग नंबर, पुरावे ठेवून बघून प्रतिदिन ५०/- रुपये अनुदान द्यावे. जेणेकरून देशी गाय सांभाळणे शेतकऱ्यास सोपे जाईल. गाय बाजारात जाणार नाही, पर्यायाने कसायाकडे (खाटकाकडे) जाणार नाही, आणि गोशाळेची गरज ही भासणार नाही, आणि आपला राज्य मातेच्या संरक्षणाचा उद्देश प्रत्यक्षरीत्या सफल होईल आणि तो खरा आहे हे सिद्ध होईल. अन्यथा नाही तर मताच्या राजकारणासाठी, शासनाने घाईघाईने घेतलेला अजून एक शासन निर्णय, एवढाच याचा अर्थ लावला जाईल. वरील मागणीची दखल न घेतल्यास या संबंधाने लवकरच सर्व शेतकऱ्यांचे लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल. असे दिलेल्या निवेदनात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्रजी पवार) पाटोदा तालुकाध्यक्ष शिवभुषण जाधव यांनी म्हटले आहे.

# पर्यावरण मंडळाच्या पहिल्या शाखेचे उद्घाटन प्रमोददादा मोरे यांच्या हस्ते उस्ताहात संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

निसर्ग व सामाजिक पर्यावरण पदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली,मुंबई विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अकोले तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या अबिटखिंड गावात पर्यावरण मंडळाच्या पहिल्या शाखेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पारंपरिक पद्धतीने करण्यात आले.

कार्यक्रमात पर्यावरण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. या स्वागत सोहळ्यातून गावाच्या समृद्ध परंपरा आणि आदरातिथ्याचे दर्शन घडले. विशेषत: पर्यावरण रक्षणासाठी गावकऱ्यांनी घेतलेल्या पुढाकाराने उपस्थित सर्व पर्यावरणप्रेमींना प्रेरणा मिळाली.

या उद्घाटन प्रसंगी निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे अध्यक्ष प्रमोददादा मोरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की भविष्यात मानवजातीला प्रदूषण विरहीत ऑक्सिजन मिळवण्यासाठी पर्यावरण चळवळ घरोघरी पोहचवणे आवश्यक आहे,व अबिटखिंड गावाप्रमाने गावोगावी पर्यावरण प्रेमींनी विशेषता युवकांनी पुढाकार घेऊन आपली गावे वनराईने नटविली पाहिजे व अबिटखिंड या गावाचा आदर्श घेऊन प्रत्येक गावात पर्यावरण शाखा तयार करून निसर्ग संवर्धनाचे विविध उपक्रम राबवून गाव सुजलाम सुफलाम केले पाहिजे यासाठी आपली संस्था त्यांना वेळोवेळी आवश्यक ती मदत आणि मार्गदर्शन करेल याप्रसंगी या कार्यक्रमासाठी सचिव वनश्रीताई मोरे, कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, प्रा.डॉ प्रविण गुणवरे,नायब तहसिलदार बेरड साहेब, मा.महापौर पिंपरी चिंचवड शकुंतला धराडे,तुकाराम अडसुळ,प्रकाश केदारी,संजय कारखिले,राजेंद्र आहेर, स्वातीताई आहिरे,संजय गायकवाड आणि सौ.मिनाक्षी मोरे उपस्थित होते.आणि इतर अनेक पर्यावरणप्रेमींची उपस्थिती होती.तसेच समस्थ ग्रामस्थ मुख्याध्यापक श्री.राजेंद्र उकिरडे सर, श्री.विजय घनकुटे,श्री.गोविंद घनकुटे,श्री.सुधाकर गोडे,श्री.मुरलीधर गोडे,श्री.किसन भांडकोळी,श्री.सुनिल शिंदे,श्री.शंकर गोडे,श्री.अनिल भोजने,श्री.सुनिल भोजने इ.ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रम प्रसंगी बाळासाहेब ढोले,सरपंच आंबी खालसा,वनश्री ताई मोरे,राजश्री आहेर,रामेश्वर चेमटे,राम वाकचौरे या पर्यावरणप्रेमींना सह्याद्री पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी रामनाथ भोजने साहेब,प्रा.चंद्रकांत भोजने,भैरवनाथ सेवा मंडळ नोकरदार ग्रामीण व शहरी, ग्रामपंचायत अबिटखिंड आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# सरपंच बापूसाहेब पा.कौडगावकर यांचे गाव विकासात्मक कार्य महान-पुरुषोत्तम महाराज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

गावचा प्रमुख म्हणून जेव्हा आपल्या खांद्यावर गावकऱ्यांनी विकासाची धुरा दिल्यानंतर त्या गावाचा विकासात्मक कार्य करणे हे काम कौडगाव नगरीचे सरपंच बापूसाहेब पाटील कौडगावकर यांचे कार्य महान आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध ह.भ.प.पुरुषोत्तम पाटील महाराज बुलढाणेकर यांनी मौजे कौडगाव (ता.उमरी ) येथे युवा नेते तथा सरपंच बापूसाहेब पाटील कौडगावकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात उपस्थित भाविकांना केला आहे.

माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व आ.राजेश पवार यांचे खंदे समर्थक कौडगावचे सरपंच बापूसाहेब पाटील कौडगावकर यांचा वाढदिवस काल दिनांक १ ऑक्टोबर रोजी विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला यात कौडगांव येथे मारोती मंदिर दर्शनाने वाढदिवसाला सुरूवात करण्यात आली व त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे हार अर्पण करून बिजेगाव येथे श्री.दत्त मंदिर दर्शन, उमरी येथे बालाजी मंदिर दर्शन, सदानंद बाबा महाराज मंदिरामध्ये दर्शन, उमरी ग्रामीण रुग्णालयामध्ये ब्लँकेट व फळे वाटप, उमरी येथे मोंढा मध्ये जिवलग मित्र गजानन पाटील होटाळकर यांच्या वतीने भव्य क्रेन हार घालून सत्कार करण्यात आला त्यानंतर ईज्जतगाव येथे भवानी मातेचे दर्शन,येंडाळा येथे हनुमान मंदिर येथे महाप्रसादाच आयोजन, मित्र मंडळाच्या वतीने जिल्हा परिषद शाळा कौडगांव, येंडाळा, महाटी विद्यार्थ्यांना वह्या, डेक्स, जिल्ह्यामध्ये कबड्डी संघामध्ये दुसरा क्रमांक मिळालेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी वाटप, तालुक्यामध्ये धावण्यामध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी वाटप, बौद्ध विहार कौडगांव येथे अभिष्टचिंतन, ग्रामपंचायत कौडगांवच्या वतीने वृक्षारोपण, कौडगांव,येंडाळा,महाटी उमरी तालुक्याच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळा, महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार ह.भ.प.पुरुषोत्तम पाटील महाराज बुलढाणेकर यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते ...

यावेळी प्रमुख उपस्थितीत सौ.पूनमताई राजेश पवार, रमेशराज बाबा शास्त्री बिजेगावकर, अरविंद महाराज उमरी, मनोज पाटील मोरे, गणेशराव पाटील कोडगावकर, पारस सेठ दर्डा, डॉ.विक्रम देशमुख तळेगावकर, व्ही.आर कोंडेकर निवृत्त गटविकास अधिकारी, तहसीलदार प्रशांत थोरात, पी.आय माने साहेब, गटविकास अधिकारी अडबलवार साहेब, तलाठी पांडे साहेब, ग्रामसेवक फुलारी साहेब, मनोज आरगुलवार, पत्रकार बाळासाहेब पांडे, नरेंद्र येरावार व राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, स्तरातील मान्यवरांनी अभिष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अथक परिश्रम बापूसाहेब पाटील कौडगांवकर मित्र मंडळ उमरी यांनी घेतले व यशस्वी पार पडला.



### आंबेडकरी चळवळीचे नेते सुरेशदादा गायकवाड यांना

## काँग्रेसकडून देगलूर विधानसभेची उमेदवारी देण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



देगलूर/बिलोली या दोन तालुक्यातील भारतीय संविधानातील मुलतत्वांवर काम करणारी सर्व जाती तरुणांची संघटना प्रजाराष्ट्र मोर्चा या संघटनेचे १५० गावात सुजान, अभ्यासू तरुणांचे संघटन असून देशातील संविधान विरोधी, आरक्षण विरोधी भाजपाप्रणित महायुतीला सत्तेतून बाहेर काढण्यासाठी प्रजाराष्ट्र मोर्चा ही संघटना गेल्या अनेक दिवसांपासून काम करत असून यापूर्वी रावसाहेब अंतापूरकर व जितेश अंतापूरकर यांना पाठिंबा दिला आणि भाजपाला जिंकू न देता काँग्रेसचा उमेदवार निवडून आला आहे. याकरिता यावेळी अनुजाती, बहुजन समाजातील अभ्यासू नेता सुरेशदादा गायकवाड यांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी द्यावी आणि संविधान विरोधी, आरक्षण विरोधी भाजपाप्रणित महायुतीला बाहेर ठेवण्याकरिता त्याच तोडीचा तगडा जिंकण्यासारखा उमेदवार मतदारसंघात दुसरा नाही, म्हणून सुरेशदादा गायकवाड यांना देगलूर विधानसभेची उमेदवारी द्यावी, अशी मागणी प्रजा राष्ट्र मोर्चा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गौतम भालेराव काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे एका निवेदनाद्वारी केली आहे.

संविधान बचावासाठी आयुष्यभर काम केलेल्या सुरेशदादा गायकवाड यांना उमेदवारी दिल्यास एससी, एसटी, ओबीसी प्रवर्गातील खूप मोठा जनसमूह काँग्रेस पक्षाला जोडून उमेदवार निवडून येण्यासोबतच नांदेडचे खासदार स्वर्गीय वसंतराव चव्हाण यांनी पूर्ण मराठवाड्यात पक्षाला फायदा होईल, असे सांगितले होते. देगलूर विधानसभेतील एससी, एसटी, ओबीसी तरूणांनी सुरेशदादा गायकवाड यांना संविधान बाचाव करिता निवडणूक लढवण्याची विनंती केली. त्यानुसार सुरेशदादा गायकवाड निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे काँग्रेस पक्षाने संविधानाचे विभाजन टाळून जिंकून येणार्या उमेदवारांना तिकीट दिल्यास नक्कीच विजय आपलाच आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर प्रजाराष्ट्र मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष गौतम भालेराव, राष्ट्रीय अध्यक्ष कुणाल लोहगावकर, उपाध्यक्ष बबलूभाई शेख, सचिव मारोती कांबळे यांच्या स्वाक्षर्या आहेत.

### मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत तालुक्यातील ऑनलाईन अर्ज भरलेल्या

## सर्व बहिणींना तात्काळ मध्ये त्यांच्या खात्यामध्ये पैसे वर्ग करावे-सामाजिक कार्यकर्ते नागनाथ माळगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

धर्माबाद तालुक्यातील व शहरातील मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना अंतर्गत ऑनलाइन अर्ज भरून देखील अर्ज मान्यता मिळालेल्या बहिणींच्या वापरून देखील खात्यामध्ये पैसे जमा झाले नाहीत अश्या सर्व बहिणीच्या खात्यामध्ये पैसे विना विलंबन न करता त्यांचा खात्यामध्ये पैसे जमा करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते नागनाथ पाटील माळगे यांनी तहसीलदार यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी महोदयाकडे लेखी निवेदनाद्वारे केले आहेत. केवायसी, मोबाईल लिंक, आधार लिंक, या सर्व बाबीसाठी बँकेच्या बाहेर लाईन न थांबवता एकदाच सर्व महिलांचे फार्म बँक अधिकाऱ्यांनी कलेक्ट करून केवायसी आणि मोबाईल नंबर लिंक करून घ्यावेत आणि आणि माझ्या माता भगिनींना माझ्या तालुक्यातील व शहरातील सर्व माझ्या बहिणीची परेशानी तात्काळमध्ये थांबवावी तसेच आपल्या स्तरावरून संबंधित लीड बँक व सर्व बँकांना आदेशित करावे माझ्या तालुक्यातील व शहरातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील ऑनलाईन फॉर्म भरलेल्या अप्रुव्हल मिळालेल्या तालुक्यातील शहरातील माझ्या सर्व बहिणीचे पैसे तात्काळ मध्ये त्यांचा खात्यामध्ये जमा करावे अशी मागणी नागनाथ पाटील माळगे व जाजुलवाड पांडुरंग यांनी एका निवेदनाद्वारे मागणी केली आहे.





मराठा योद्धा मा.मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या आरक्षणाच हा लढा लढत असताना त्यांची प्रकृती खालावली होती, त्यांना गॅलेक्सी सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर येथे ऍडमिट केले असता संभाजीनगर येथे जाऊन ड. गोविंद डूमने, शिवशंकर पाटील कलंबरकर,भाई मोहन गुंड, दिनेश पाटील,राजू पाटील सुरनर , माधव पा.होंनवडजकर यांनी भेट घेऊन तब्येतीविषयी विचारपूस केली व मराठा आंदोलनाबाबत चर्चा करण्यात आली.



कौठा येथील राज्य परिवहन महामंडळाचे मुखेड आगारातील कर्मचारी श्री वैजनाथ वाघमारे यांचा मुलगा सुजय वाघमारे याची भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल अभिनंदन करतांना लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष प्रभाकर पांडे वैजनाथ वाघमारे परमेश्वर घोरपडे पिरअहमद साहेब सह मित्रमंडळ कौठा

### शिवस्वराज्य मसाले गुळाचे चहा हॉटेलचे

## ह.भ.प.स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंद महाराज यांच्या हस्ते उदघाटन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



शिरूर (कासार) तालुक्यातील नागरेवाडी येथील मेहनती तरूण असणारे अशोक नवनाथ धनगुडे व गणेश नवनाथ धनगुडे यांनी शिरूर कासार शहराच्या वैभवात भर घालणारे शिवस्वराज्य मसाले गुळाचे चहाचे हॉटेल सुरू केले असून याचा शुभारंभ श्री क्षेत्र मत्स्येंद्रनाथगडाचे मठाधिपती ह.भ.प.स्वामी जनार्दन महाराज गुरू निगमानंद महाराज व सिध्देश्वर संस्थान शिरूर कासारचे मठाधिपती महंत स्वामी विवेकानंद शास्त्री महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्या प्रसंगी माजी ग्राम पंचायत सदस्य अशोक नागरे, प्रल्हाद धनगुडे, नवनाथ धनगुडे, दत्ता आश्रुबा धनगुडे, चंद्रकांत धनगुडे, संदिप शिंदे, रविंद्र धनगुडे, शहादेव आमले, अशोक सुळे, तुकाराम धनगुडे, बाळु काशीद, राजेंद्र धनगुडे, राजेश धनगुडे, बाबासाहेब धनगुडे, अर्जुन धनगुडे, कृष्णा कापसू, केशव जाधव, दत्ता जाधव, उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सामाजिक कार्यकर्ते गोकुळ भाऊ सानप रायमोहाकर यांनी केले तर आभार शिवस्वराज्य हॉटेलचे मालक अशोक नवनाथ धनगुडे यांनी मानले.


### होऊ घातलेल्या विधानसभेसाठी

## संपूर्ण लोणी जिल्हा परिषद गट मा.ना.श्री.साहेबराव दरेकर नाना यांच्या पाठीशी-डॉ.ईश्वर वाळके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

क्षेत्रफळ व मतदानाच्या दृष्टीने बीड जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदार संघ हा आष्टी,पाटोदा शिरूर आहे या मतदारसंघात तीन तालुक्यांचा समावेश होतो. या मतदार संघाचा बहुतांश भाग हा नगर जिल्ह्याला लागून आहे.या ठिकाणी आपल्या सडेतोड व स्पष्ट भूमिकेत ठाम असणारे लोकप्रिय सर्वांचे लाडके नेतृत्व मा.श्री.साहेबराव दरेकर नाना यांचा प्रभाव जास्त आहे त्यामुळे साहेबराव दरेकर नाना यांना मानणारा वर्ग या ठिकाणी जास्त असून साहेबराव दरेकर नाना यांना पक्षाने जर संधी दिली तर ते निश्चितपणे सोन करतील. अशी त्यांच्या कार्यकर्त्यांना अशा अपेक्षा आहे.या गटामध्ये साहेबराव दरेकर नाना निश्चित आमदार होतील या चर्चा जोरदार प्रमाणात पहावयास





मिळत आहेत.साहेबराव दरेकर नाना यांचा या गटांमध्ये चांगला संपर्क आहे गावची लोकसंख्या किती यापासून गावचे संपूर्ण माहिती ही दरेकर नाना यांना असते प्रत्येकाच्या सुख-दुःखात नाना उपस्थित असतात सार्वजनिक कार्यक्रमात नानांचा सहभाग असतो गावातील सप्ताह जत्रा यांना देखील त्यांची आवर्जून उपस्थिती असते नाना जनसंपर्कावर जास्त प्रमाणात भर देतात त्यामुळे नानांना जर पक्षाने संधी दिली तर त्या उपकाराची परतफेड मतदानाच्या रूपामध्ये लोणी जिल्हा परिषद गट केल्याशिवाय राहणार नाही अशा संपूर्ण लोणी जिल्हा परिषद गटाला आहे त्यामुळे साहेबराव दरेकर नाना हे निश्चित आमदार होतील यामध्ये मात्र शंका नाही असे महागणेश मल्टीस्टेट चे संचालक डॉ.श्री.ईश्वर वाळके यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील क्रीडा संकुलांच्या कामांसाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही-क्रीडामंत्री बनसोडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिर्डी । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्ह्यात क्रीडा विकासासाठी आवश्यक असलेल्या नवीन क्रीडा संकुलांच्या कामांसाठी निधीची कमतरता पडू दिला जाणार नाही,अशी ग्वाही राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिली.

नांदुर्खी ब्रुदूक येथील राहाता तालुका क्रीडा संकुलाच्या उद्घाटनप्रसंगी क्रीडामंत्री श्री.बनसोडे बोलत होते. याप्रसंगी महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील, नांदुर्खीचे सरपंच माधवराव चौधरी, राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, उप विभागीय अधिकारी माणिक आहेर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे गटविकास अधिकारी जालिंदर पठारे आदी उपस्थित होते. क्रीडामंत्री श्री. बनसोडे म्हणाले, महाराष्ट्रात क्रीडा विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारांच्या रकमेत वाढ करण्यात आली. मिशन लक्षवेध योजनेद्वारे महाराष्ट्रातून ऑलिंपिक खेळाडू तयार करण्यावर भर देण्यात येत आहे. एशियन व ऑलम्पिक पदक विजेत्या खेळाडूंच्या बक्षिस रकमेत भरघोस वाढ करण्यात आली. २०१८ पासून नियुक्ती अभावी प्रलंबित २०० खेळाडूंना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या. महिला, युवक, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांसाठी शासन लोकाभिमुख योजना राबवित आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, अन्नपूर्णा योजना आणि युवकांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण यांसारख्या योजनांच्या माध्यमातून शासन महिला व युवकांसाठी काम करत आहे, असेही श्री.बनसोडे यांनी सांगितले. पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, शासनाच्या क्रीडा विभागाचे विविध योजनांच्या माध्यमातून गतीने काम सुरू आहे. 'खेलो इंडिया' उपक्रमामुळे खऱ्या अर्थाने देशाच्या क्रीडा विकासाला चालना मिळाली आहे. अहमदनगर शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुल विकसित करण्यासाठी शासनाचे प्राधान्य आहे. यासाठी लागणाऱ्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करण्यासाठी शासनास्तरावरून क्रीडा विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. शिर्डी येथील शेती महामंडळाच्या जागेवर ४० हजार आसन क्षमतेचे स्टेडियमचे बांधकाम करण्याचे विचाराधीन असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नांदुर्खी येथील प्रगतशील शेतकरी राजेंद्र चौधरी यांचे यावेळी भाषण झाले. तालुका क्रीडा अधिकारी भाऊराव वीर यांनी प्रास्ताविक केले.

**असे आहे क्रीडा संकुल** –पाच एकर जागेत साकारण्यात आलेल्या या तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामास ४ कोटी १८ लक्ष रूपये खर्च झाला आहे. या क्रीडा संकुलामध्ये ४०० मीटर धावपट्टी, बॅडमिंटनचे इनडोअर दोन कोट, संरक्षण भिंत, त्याचबरोबर इतर क्रीडा सुविधा आहेत.

# बोगस कामे करणाऱ्या गुतेदारांना अधिकाऱ्यांचे पाठबळ

# कोट्यवधीचा खर्च होवूनही रस्त्यांची बकाल अवस्था

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**




नायगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागांतर्गत तालुक्यात राज्य मार्ग, जिल्हा मार्ग व प्रमुख मार्गाची कोट्यवधी रुपयांची कामे सुरु आहेत. या कामाच्या अंदाजपत्रकात अनेक महत्त्वाच्या तरतुदी ठेवण्यात आल्या मात्र एकही गुत्तेदार अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार काम करत नाही. कोट्यवधी रुपयांची कामे टक्केवारीत अडकल्याने अनेक महत्वाच्या रस्त्यांची अल्पावधीतच वाट लागली आहे. मोठ्या प्रमाणात निधी मिळाल्यानंतरही अतिशय सुमार दर्जाचे काम होत असता टक्केवारीच्या ओझ्याखाली दबलेले अधिकारी तोंडावर बोट व कानावर हात ठेवून बसले आहेत याचा फटका नागरिकांना बसतो आहे.

सध्या नायगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागात एकाच नेत्याची दादागिरी सुरु असून अधिकारी या नेत्याच्या दावणीला बांधले असल्यासारखे वावरत आहेत. रस्ते कामाचे अंदापत्रक तयार करतांना अनेक मोठ्या तरतुदी ठेवण्यात येत आहे पण काम करतांना अंदाजपत्रकातील मानकानुसार कामे करण्यात येत नाहीत. कुणी तक्रार केली तरच त्या कामावर अधिकारी जातात आणि चौकशी करण्याचा फार्स करतात. मागच्या चार वर्षात नायगाव तालुक्यात १०० किलोमीटर रस्ते झाले असतील यासाठी जवळपास २०० कोटीचा खर्चही झाला आहे पण यातील एकाही रस्त्याची गुणवत्ता अंदाजपत्रकातील मानकानुसार नाही. विशेषतः नायगाव उपविभागात वार्षिक दुरुस्ती करणे आणि नळकांडी पुलाची कामे दरवर्षी केल्या जातात. या कामातून केवळ अधिकारी आणि गुत्तेदारांना पोसण्याचे काम होत आहे.

दरवर्षी वार्षिक दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयाची कामे हाती घेतली जातात पण ती कामे कुठे होतात हे कुणालाच कळत नाहीत. दुसरीकडे याच रस्त्यावर सुधारणेचे काम करण्यात येते. नायगाव तालुक्यातील घुंगराळा ते बळेगाव रस्ता १० कि.मी. खर्च १३ कोटी, शेळगाव छत्री-सुजलेगाव-औराळा-कोठाळा १० कि.मी. खर्च १५ कोटी, नायगाव बेंद्री मंजरम ५ कि.मी. खर्च ६ कोटी, कुंटूर फाटा ते कुंटूर ८ कि.मी. खर्च ८ कोटी, कहाळा फाटा ते पाटोदा बरबडा अंतरगाव १२.५ कि.मी खर्च १६ कोटी आणि हुस्सा ते राहेर ६ कि.मी. खर्च ७.८० कोटी असा जवळपास वरील सर्व कामासाठी जवळपास ६६ कोटींचा खर्च झालेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च होवूनही या सर्व रस्त्यांची केवळ सहा महिण्यातच बकाल अवस्था झाली आहे. झालेल्या कामाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दुर्लक्ष केल्याने संबधीत गुतेदार अतिशय सुमार दर्जाचे व बोगस कामे केली आहेत.

या सर्व बोगस व सुमार दर्जाच्या कामाला नायगाव सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपभियंता बारसकर व देगलूरचे कार्यकारी अभियंता कोटलवार हे पाठबळ देत असल्याचा आरोप करुन वरील कामाची चौकशी गुणनियंत्रण पथकाकडून करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अंकुशकुमार देगावकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागच्या मुख्य अभियंत्यासह गुणनियंत्रण विभागाचे अधिक्षक अभियंता व नांदेड विभागाचे मंडळ अधिक्षकाकडे तक्रार केली आहे.

## बोगस पिक कापनी प्रयोग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी संभाजी ब्रिगेड ची मागणी





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । वृत्तसंस्था**

वसमत तालुक्यात कृषी अधिकारी व पिकविमा कंपनीने मिलीभगत करून उडिद व मुगाचे पिक कापनी प्रयोग हे फक्त कागदावरच करून बोगस केले असून पिकविमा कंपनीच्या सोयीनुसार उंबरठा उत्पन्न दाखवले असून यामध्ये शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये पिकविमा कंपनीने लुटले आहेत कंपनी च्या नफ्यासाठी शासकीय अधिकारी व पिकविमा कंपनीचे प्रतिनिधी हे शेतकऱ्यांचे सरास नुकसान करत आहेत म्हणून वसमत येथे संभाजी ब्रिगेड च्या वतीने कृषी कार्यालयात ठिय्या आंदोलन केले होते पण संपूर्ण माहिती मिळाली असता सर्व पिक कापनी प्रयोग चे तक्ते हे बोगस असून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात यावे असं निवेदन संभाजी ब्रिगेड च्या वतीने मा. जिल्हाधिकारी हिंगोली यांना देण्यात आले आहे व कार्यवाही नाही झाल्यास संभाजी ब्रिगेड च्या वतीने तिव्र असं आंदोलन करण्यात येईल असा इशारा संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष सतीश पाटील महागावकर यांनी दिला आहे यावेळी निवेदन देताना आलोक पाटील इंगोले, महेश राखोंडे, गजानन हाके,मोरोती क-हाळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## मेहकर लोणार तालुक्यातील अतिवृष्टीचे

# पंचनामे करून तत्काळ मदत जाहीर करा नसता तीव्र आंदोलन छेडू-डॉ.गोपाल बच्छिरे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

मेहकर लोणार तालुक्यातील परतीच्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे त्याचे पंचनामे करून तत्काळ मदत जाहीर करा नसता आंदोलन छेडू असा इशारा शिवसेना उबाठा जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरेंनी शासनास दिला

उपविभागीय कार्यालय मेहकर येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र निदर्शने करून उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी व कृषिमंत्री यांना निवेदन देऊन गत २५ सप्टेंबर रोजी झालेल्या परतीच्या अतिवृष्टीने मेहकर व लोणार तालुक्याच्या सहा विभागात शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे त्या विभागातील पंचनामे करून तत्काळ शेतकऱ्यांना मदत जाहीर करा अन्यथा शासनाच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा उपविभागीय कार्यालयासमोर निदर्शने करून निवेदनाद्वारे देण्यात आला याप्रसंगी शिवसेना जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांच्या सह गजानन जाधव, लूकमान कुरेशी, श्रीकांत मादनकर, गजानन निकस, गजानन गीते, एकबाल कुरेशी, गोपाल वैद्य, शंकर कोकाटे, ज्ञानेश्वर दूधमोगरे, कैलाश उबाळे, मंदाकिनी वैद्य, गोदावरी वैद्य, पंचफुला वैद्य, धुरपताबाई नरवाडे, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते आज लोह्यात ९० कोटीच्या विविध विकास कामाचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्याहस्ते दि. ४ ऑक्टोबर रोजी शुक्रवारी लोहा शहर व तालुक्यात सा. बां. विभाग नांदेड अंतर्गत विविध विकासकामांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालय पोलीस स्टेशनच्या बाजूला दुपारी दीड वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

लोहा ते गुराखी गड रस्त्याचे भूमिपूजन (३ कोटी), लोहा ते धानोरा मक्ता ते आडगाव फाटा रस्त्याचे भूमिपूजन(६ कोटी) सा.बा.उपविभाग इमारत बांधकामलोकार्पण (२.३० कोटी), लोहा - गोडाऊन बांधकाम लोकार्पण(९.५९ कोटी), उपजिल्हा रुग्णालय निवासस्थान बांधकाम लोकार्पण (१३.७६ कोटी), न्यायाधीश निवासस्थान बांधकाम लोकार्पण (२.५७कोटी) सा.बा. निवासस्थान लोहा बांधकाम लोकार्पण(१.६५ कोटी)

कारेगाव पिंपळगाव ढगे मलकापूर रस्त्याचे उद्घाटन(६.५८ कोटी) घावरी गावाजवळ पुलाचे बांधकाम लोकार्पण(२.५० कोटी) रायवाडी गावाजवळ पुलाचे बांधकाम लोकार्पण (२.७० कोटी) पारडी ते पोखरभोसी रस्त्याचे उदघाटन (८ कोटी),

भारसवाडा ते अंतेश्वर रस्त्याचे भूमिपूजन(३ कोटी) सुभाष नगर ते धानोरा मक्ता रस्त्याचे उदघाटन व देऊळगाव ते सावरगाव रस्त्याचे उदघाटन (६.५० कोटी), पेनूर ते शेवडी रस्त्याचे भूमिपूजन(५ कोटी), जिल्हा सीमा (पारवा) ते पेनूर रस्त्याचे भूमिपूजन (३ कोटी), आडगाव गावाजवळ पुलाचे बांधकाम भूमिपूजन (३.५० कोटी), देऊळगाव पाटी ते देऊळगावर स्त्याचे भूमिपूजन (१.६२ कोटी) तसेच लोहा शहरातील विविध प्रभागातील सीसी रस्ते, स्मशानभूमी, अशुरखाणा, नाली बांधकामाचे उद्घाटन व लोकार्पण सुद्धा आ. श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास नागरिक व ग्रामस्थांनी मोठ्यसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विक्रांत दादा शिंदे मित्र मंडळाकडून करण्यात आले आहे.

## सन फार्मा लॅबोरेटरी व वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शेडाळा येथे १९ महिला बचत गटांना १६४ सायकल कोळपे देण्यात आले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



दिनांक २ ऑक्टोंबर २०२४ रोजी मौजे शेडाळा तालुका आष्टी जिल्हा बीड येथे सन फार्मा लॅबोरेटरी च्या अर्थसहाय्याने वॉटर संस्था 'जलसुरक्षा द्वारे ग्रामीण समुदायाचे जीवनमान सुधारणे प्रकल्प' राबवत आहे त्यानिमित्ताने या प्रकल्पांतर्गत शेडाळा गावातील एकूण १९ महिला बचत गटांना एकूण १६४ सायकल कोळपे महिलांच्या कामाचे ओझे कमी करण्यासाठी देण्यात आले.शेतात पारंपारिक पद्धतीने महिला खुरपणी करत असताना त्यांना अधिक श्रम लागत असे तसेच पाठ दुखीचा त्रास ही होत असे त्यावर पर्याय म्हणून सायकल कोळपे अतिशय परिणामकारक आहे. त्यामुळे महिलांचा कामाचे ओझेही कमी होईल तसेच कमी वेळेत जास्त कामे होतील.सदरील कार्यक्रमास सन फार्मा लॅबोरेटरी चे श्री सोमनाथ डडास,वॉटर संस्थेचे श्री प्रसाद वारे,शेडाळा गावचे ग्रामस्थ श्री जावेद शेख,श्री विठ्ठल अडसरे व १९ महिला बचत गटातील सदस्य तसेच वॉटर संस्थेचे आष्टी तालुका टीम उपस्थित होती.

# जिल्ह्यात २ कोटी ज्येष्ठ नागरिकांना मोफत तर 3 कोटी महिलांना सवलतीत एसटी प्रवासाचा लाभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

देशाच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून मोफत प्रवास योजना शासनाने सुरू केली असून जिल्ह्यातील सुमारे २ कोटी ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला. १२ वर्षावरील महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या ५० टक्के सवलतीत एसटी प्रवासाचा लाभ जिल्ह्यातील ३ कोटी महिलांनी घेतला आहे.भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १६ ऑगस्ट २०२२ रोजी राज्यातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी बसमधून मोफत प्रवासाची घोषणा केली होती. अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेचा लाभ राज्यातील सुमारे १५ लाख ज्येष्ठ नागरिकांना होणार असून एसटीच्या शिवनेरीसह सर्व सेवांसाठी ही मोफत प्रवास योजना लागू आहे. राज्य परिवहन महामंडळाद्वारे ज्येष्ठ नागरिकांची ३४ लाख ८८ हजार स्मार्ट कार्डची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांची संख्या १४ लाख ६९ हजार आहे. सध्या राज्यात ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी बसेस मधून प्रवासासाठी ५० टक्के सवलत दिली जाते. अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना बसमधून प्रवासादरम्यान वाहक शून्य मूल्य वर्ग तिकीट देण्यात येते. विशेष म्हणजे मोफत प्रवासाची ही सवलत एस टीच्या सर्व सेवांसोबतच शिवनेरी बस सेवेसाठीदेखील लागू आहे. वातानुकुलीत, शयनयानसह सर्व सेवा प्रकारांमध्ये ही सवलत अनुज्ञेय आहे. ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवांमध्ये ५० टक्के सवलत मिळत आहे. आता वातानुकुलीत, शयनयान आणि शिवनेरी या उच्चश्रेणी सेवांनाही ही सवलत लागू होणार आहे.७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना बसमधून मोफत प्रवासासाठी आधारकार्ड, पॅनकार्ड, वाहन परवाना, पारपत्र, निवडणूक ओळखपत्र व केंद्र आणि राज्य शासनातर्फे निर्गमित केलेले ओळखपत्र यापैकी कुठलेही एक ओळखपत्र वाहकाला दाखविल्यास शून्य मूल्य वर्गाचे तिकिट देऊन मोफत प्रवास करता येईल.महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत;महिला प्रवाशांची संख्या वाढलीमहाराष्ट्र राज्याच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये सर्व महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस प्रवास भाड्यामध्ये ५० टक्के सवलत घोषित करण्यात आली. या घोषणेच्या अनुषंगाने १७ मार्च २०२३ पासून सर्व महिलांना 'महिला सन्मान योजने'अंतर्गत राज्याच्या हद्दीपर्यंत म्हणजेच राज्यांतर्गत धावणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस प्रवास भाड्यामध्ये ५० टक्के सवलत लागू करण्यात आली. जिल्ह्यातील सुमारे ३ कोटी महिलांना या योजनेचा लाभ झाला असून एसटीने प्रवास करणाऱ्या महिलांची संख्याही वाढली आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904